साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
मुख्य संपादक : रवींद्र एन. कोटंबकार
मो.नं. ९०९६९६८३४०
कार्यालय : ब्लॉक नं. ७४,७५रजत संकुल, रॉय उद्योग परिसर, बसस्थानकच्या समोर, गणेशपेठ, नागपूर-१८
E-mail : dsahasikngp@gmail.com
श्री. अकिल अहमद उर्फ गुड्डुभाई
नागपूर विभाग संपादक
मो.नं. ९११२२७४११०

दैनिक
# साहसिक
सजग समाजाचा दक्ष प्रहरी
epaper
www.sahsik.com




वर्धा, नागपूर, अमरावती, अकोला, बुलडाणा,गडचिरोली, धुळे, जळगाव, औरंगाबाद, नाशिक, पुणे, रत्नागिरी, मुंबई व दिल्ली येथुन एकाचवेळी वितरित ...!

वर्ष : १४ | अंक : ६० | शनिवार २९ ऑगस्ट २०२० | मुख्य संपादक : रविंद्र एन. कोटंबकार | (पृष्ठ -८) | मूल्य : ३ रुपये

### सुविचार

काही लोक स्लीपर
चप्पलसारखे असतात,
साथ देतात, पण मागून
''**चिखल**''पण उडवतात.

### चारोळी

ओठावर नांव तिचे
सेते रात्रं-दिनी,
प्रेम विरहाची वेदना,
सलते माझ्या मनी

### हसा जरा जपून..

आम्ही दिवाळी येतेय म्हणून आनंदी आणि परिक्षा येतेय म्हणून दु:खी कधीच झालो नाही, कारण दोन्ही ठिकाणी दिवेच तर लावायचे होतेय!

# कायद्याचे ज्ञान नसतांना सुप्रीम कोर्टावर टीका करणारा नरीमन गँगचा सदस्य व देशद्रोही पाखंडी वकील दुष्यंत दवे विरोधात फौजदारी कारवाईची मागणी



**रशीद खाँ पठान**
**राष्ट्रीय सचिव**
**मानव अधिकार सुरक्षा परिषद**

- **देशातील कोणत्याही न्यायालयात काम करण्यापासून रोखण्याची मागणी**
- **सनद रदद करून कोर्ट अवमाननाची कारवाई करण्याची मागणी.**
- **दै. इंडियन एक्सप्रेसही देशविरोधी कृत्यात सहभागी असल्याचे उघड. आरोपींना त्वरित अटक करण्याची मागणी.**
- **देशविघातक शक्तींना समर्थन देणाऱ्यांना पाकिस्तानच्या आय. एस. आय. कडून कोट्यावधी रुपये दिल्याचा पूर्व रॉ अधिकारी सूद यांचा आरोप.**
- **प्रधानमंत्री कार्यालयाचे आदेशावरून दिल्ली पोलिसांकडून चौकशी सुरु**



**हाच तो कायद्याचे ज्ञान नसताना सर्वोच्च न्यायालयाच्या चुका काढणारा मुर्ख, पाखंडी देशद्रोही नरीमन गँगचा सदस्य दुतोंड्या दलाल ॲड.दुष्यंत दवे.**



**शत्रू देश पाकीस्तान व चीनच्या सैन्याला फायदा पोहचविण्यासाठी कट रचून बेकायदेशीर बातम्या प्रकाशित करणारा मास्टरमाईंड देशद्रोही ॲड.फली नरीमन.**



**हाच तो भारतीय सेनेचे मनोबल खच्चीकरण करण्याकरीता व शत्रु देशांना फायदा पोहचविण्याकरीता भडकाऊ बेकायदेशीर भाषण देवून देशात अराजकता, अशांती पसरविणारा नरीमन गँगचा म्होरक्या व 'मि.ओव्हररुल्ड' नावाने प्रसिद्ध देशद्रोही निवृत्त न्यायाधीश दिपक गुप्ता.**

*साहसिक वृत्त / २८ ऑगस्ट*

**नवी दिल्ली :** ॲड. प्रशांत भूषण यांच्याविरुद्धच्या कोर्ट अवमानना प्रकरणात सुप्रीम कोर्टाच्या विरोधात जनमानस तयार करण्यासाठी दै. इंडियन एक्सप्रेस मध्ये ॲड. दुष्यंत दवे यांनी २४ ऑगस्ट रोजी प्रकाशीत केलेला लेख हाच बेकायदेशीर असल्याचे व दुष्यंत दवे यांना कोर्ट अवमानना कायद्याचे योग्य ज्ञान नसतांना असा गैरप्रकार करून वकील व्यवसायाच्या धनोबल प्रोफेशन लाध बदनाम केल्याप्रकरणी व सर्वोच्च न्यायालयाविरुद्ध अपप्रचार केल्यामुळे ॲड. दुष्यंत दवे यांचा वरीष्ठ वकीलाचा दर्जा काढून घेण्यात यावा तसेच त्यांना देशातील कोणत्याही न्यायालयात काम करण्यापासूनबंदी घालावी. आणी त्यांचाविरुध्द देशद्रोहाअंतर्गत सुरु असलेल्या केसचा तपास दिल्ली पोलीसांकडून सीबीआईकडे देवून कारवाई करण्याचे आदेश देण्यात यावे. याकरीता सर्वोच्च न्यायालयात जनहीत याचिका दाखला करण्यात येणार असल्याची माहिति मानव अधिकार सुरक्षा परिषदेचे राष्ट्रीय सचिव रशीद खान पठाण यांनी दिली.

याबाबत सविस्तर वृत्त असे की सर्वोच्च न्यायालयाची अवमानना करणारे 'ट्वीट' केल्यामुळे ॲड.प्रशांत भूषण यांच्याविरुद्ध कोर्ट अवमानना अंतर्गत कारवाई करण्यासाठी ॲड. महक माहेश्वरी यांनी याचिका दाखल केली होती. त्या याचिकेतील महितीची दखल घेत सर्वोच्च न्यायलयाने 'सुओ - मोटो' म्हणजेच स्वत: संज्ञान घेतलेली कोर्ट अवमानण्याची कारवाई सुरु करून ॲड. प्रशांत भूषणला कारणे दाखवा नोटीस काढून उत्तर दाखल करण्याचे आदेश दिले.

उत्तरवादी प्रशांत भूषणतर्फे ॲड. दुष्यंत दवे यांनी दि.५ ऑगस्ट २०२० रोजी युक्तीवाद करून न्यायालयाने नियमांचे योग्य पालन केले नसल्याचा आरोप केला. त्यावर न्या.अरुण मिश्रा, न्या.भूषण गवई व न्या.कृष्ण मुरारी यांच्या खंडपीठाने ॲड दुष्यंत दवे यांना फटकारले व सर्वोच्च न्यायालयाचे पी.एन.दुडा प्रकरणातील आदेश वाचलेत का असा खोचक प्रश्न विचारला. तरीसुद्धा दुष्यंत दवे यांनी त्यांचा बेकायदेशीर युक्तीवाद सुरुच ठेवला. त्यानंतर न्यायालयाने या मुद्द्यावर रीतसर विश्लेषण करून पी. एन. दुडा (१९८८) ३ SCC १६७ प्रकरणात दिलेल्या निर्देशानुसारच केसची दखल घेण्यात आली असल्याचे दि.१४ ऑगस्टच्या आदेशात स्पष्ट करत दुष्यंत दवे यांचा युक्तीवाद फेटाळून लावत ॲड.प्रशांत भूषण यांना कोर्ट अवमाननाचा

**प्रशांत भूषण कोर्ट अवमानना प्रकरण**
**भाग- १**

दोषी ठरविले.

शिक्षेवरील सुनावणीसाठी दि.२५ ऑगस्ट ही तारीख सर्वोच्च न्यायालयाने निश्चित केली होती. त्याआधी सर्वोच्च न्यायालयाबद्दल समाजात चुकीची माहिती पसरवून लोकांचे मन दुषीत करण्याच्या उद्देशाने २४ ऑगस्टला ॲड. दवे यांनी इंडियन एक्सप्रेस या दैनिकात एक लेख लिहून त्यामध्ये सुप्रीम कोर्टाने पी.एन.दुडाप्रकरणाचे पालन करतांना कशी चूक केली हे दाखविण्याचा प्रयत्न केला. परंतू त्यांच्या लेखात त्यांनी चुकीचा कायदा लिहिला असून ॲड दवे यांना कायदा कळत नसतांना खोट्या कायद्याच्या आधार घेवून त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायाधीशांविरुद्ध आरोप केल्यामुळे दवे हेच कोर्ट अवमाननाचे दोषी असल्यामुळे त्यांच्याविरुद्ध कठोर कारवाई करून त्यांना देशातील कोणत्याही न्यायालयात हजर

**(उर्वरित पान २ वर)**

## एसटी सुरु झाली, पण दरदिवशी होतोय २२ कोटींचा तोटा

**यापूर्वीच एसटी महामंडळ जवळपास सहा हजार कोटींच्या तोट्यात आहे.**



*वृत्तसंस्था/ २८ ऑगस्ट*

**मुंबई :** राज्यात एसटी सेवा सुरू झाल्यावर सर्वसामान्यांना दिलासा जरी मिळाला असला तरी एसटी महामंडळ दिवसेंदिवस खड्ड्यात जात आहे. कोरोनामुळे प्रवासी वाहून नेण्याचे बंधन असल्याने एसटीला दररोज सुमारे २२ कोटींचा तोटा सहन करावा लागत आहे.

यापूर्वीच एसटी महामंडळ जवळपास सहा हजार कोटींच्या तोट्यात आहे. कोरोनामुळे वाहतुकीवर निर्बंध आल्याने आता एका सीटवर एकच प्रवाशी बसवणे बंधनकारक आहे. त्यामुळे डिझेलचा खर्चही भरून निघत नाही. परिणामी पाच महिन्यांनंतर जिल्ह्यांतर्गत सुरू झालेली एसटी सेवा मरणासन्न अवस्थेकडे जात आहे.

एरवी प्रवासी वाहतुकीद्वारे एसटीला दररोज एक लाख फेऱ्यांच्या माध्यमातून २४ कोटींपेक्षा जास्त उत्पन्न मिळायचे. दररोज ६५ लाख प्रवासी प्रवास करायचे. २७ ऑगस्टच्या आकडेवारीनुसार सुमारे १५ हजार एसटीच्या फेऱ्याद्वारे ३ लाख ४१ हजार प्रवाशांनी प्रवास केला. यामधून जेमतेम सुमारे दीड कोटी उत्पन्न एसटीला मिळाले. त्यातच कोविडच्या प्रादुर्भावामुळे एसटी सेवा पूर्ण क्षमतेने ऐवजी अत्यंत मर्यादित स्वरूपात सुरू आहे. आर्थिक परिस्थिती खराब असल्याने स्वत:च्या सुमारे एक लाखापेक्षा जास्त कर्मचाऱ्यांना एसटी महामंडळ पगार देऊ शकलेले नाही. यामुळे आता कर्मचाऱ्यांचा उद्रेग होण्याची भीती व्यक्त होत आहे.

शहरी आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी आरोग्य संचालक या नवीन पदाची निर्मिती - राजेश टोपे

कोविड-१९ या साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर शहरी भागातील आरोग्य व्यवस्था अधिक परिणामकारक करण्यासाठी आरोग्य संचालक (शहरी) हे नवीन पद निर्माण करण्यात आले आहे.

# अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची परीक्षा होणारच..!

## राज्य परीक्षा घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना बढती देऊ शकत नाही



*वृत्तसंस्था/ २८ ऑगस्ट*

**नवी दिल्ली :** अंतिम वर्षांच्या परीक्षांसंबंधी सुप्रीम कोर्टाने आज महत्त्वाचा निकाल दिला आहे. परीक्षा घेण्याची तारीख पुढे ढकलली जाऊ शकते, मात्र परीक्षा होणारच असं सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केलं आहे. तसंच राज्य परीक्षा घेतल्याशिवाय विद्यार्थ्यांना बढती देऊ शकत नाही असंही सुप्रीम कोर्टाने सांगितलं आहे. अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याच्या विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) भूमिकेला सुप्रीम कोर्टात आव्हान देण्यात आलं होतं. १८ ऑगस्टला सुनावणीनंतर सुप्रीम कोर्टाकडून निर्णय राखून ठेवण्यात आला होता.

न्यायमूर्ती अशोक भूषण, आर सुभाष रेड्डी आणि एम आर शाह यांच्या खंडपीठाने आज निकाल दिला. सुप्रीम कोर्टाने निकाल देताना यूजीसीच्या अधिकारांवर शिक्कामोर्तब केलं आहे. जर एखाद्या राज्याने परीक्षा न घेण्याचा निर्णय घेतला असेल तर त्यांना युजीसीकडे दाद मागण्याचा पर्याय असून ते तारीख पुढे ढकलण्याची मागणी करु शकतात असं सुप्रीम कोर्टाने म्हटलं आहे.

आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत राज्यं परीक्षा पुढे ढकलू शकतात. मात्र यूजीसीसोबत चर्चा केल्यानंतर त्यांनी नवीन तारीख निश्चित करावी लागेल असं सुप्रीम कोर्टाने सांगितलं आहे. तसंच ३० सप्टेंबरच्या आधी परीक्षा आधी घेणं अनिवार्य नसल्याचंही सुप्रीम कोर्टाने निकालात सांगितलं आहे.

परीक्षा घेण्याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाने ६ जुलै रोजी मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या होत्या. परीक्षा ऑनलाइन,

**(उर्वरित पान २ वर)**

### सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार घेत परीक्षा घेण्यासंदर्भात भूमिका मांडली आहे.



**वि**द्यापीठाच्या अंतिम वर्गाच्या परीक्षा होणार की नाही याबाबत सुप्रीम कोर्टाने मोठा निर्णय दिला आहे. परीक्षेची तारीख बदलू शकते मात्र परीक्षा रद्द होणार नाही, असा निर्णय सुप्रीम कोर्टानं दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानंतर राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांनी पत्रकार घेत परीक्षा घेण्यासंदर्भात भूमिका मांडली आहे.

उदय सामंत म्हणाले की, 'सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णायाचा आदर करतो. राज्य सरकारनं विद्यार्थी व पालकांची भूमिका ठामपणे न्यायालयात मांडली. अंतिम वर्ष अंतिम सत्राच्या परीक्षांबाबत आरोग्याचा प्रश्न लक्षात घेऊन त्या रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. तसेच प्रतिज्ञापत्रातही आम्ही या परिस्थितीत परीक्षा घेऊ शकत नाही असं कळवले होते. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षेचा निर्णय घेण्याबाबत ऐच्छिक मुभा द्यावी, असं सरकारनं न्यायालयाला सांगितलं होतं. तसा शासन निर्णयही काढण्यात आला होता. परीक्षा रद्द करण्याचं सरकारनं म्हटलं नव्हतं. पण करोनाची परिस्थिती लक्षात घेऊन पदवी देण्याचा निर्णय होता. ज्या विद्यार्थ्यांना ग्रेडसाठी परीक्षा द्यायची आहे. त्यांच्यासाठी घेतली जाणार होती. मात्र, सर्वोच्च न्यायालयानं परीक्षा घेण्याचा निर्णय दिला आहे. त्यामुळे परीक्षा न घेण्याचा निर्णय विद्यार्थी आणि पालक यांचा विचार करून घेतला होता. याबाबत आरोप -प्रत्यारोप करण्यापेक्षा सुप्रीम कोर्टाच्या आदेशाचे पालन करून यातून मार्ग काढावा लागेल आणि या निर्णयाचा आदर सर्वांनाच करावा लागेल.'

'महाराष्ट्र सरकारनं कोणतंही संकट नसताना हा निर्णय घेतलेला नव्हता, तर विद्यार्थी, पालक

**(उर्वरित पान २ वर)**

# शहरी आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी आरोग्य संचालक या नवीन पदाची निर्मिती : राजेश टोपे



*साहसिक वृत्त / २८ ऑगस्ट*

**मुंबई :** कोविड-१९ या साथीच्या आजाराच्या पार्श्वभूमीवर शहरी भागातील आरोग्य व्यवस्था अधिक परिणामकारक करण्यासाठी आरोग्य संचालक (शहरी) हे नवीन पद निर्माण करण्यात आले आहे. त्यासोबतच अन्य सहा पदे देखील निर्माण करण्यात आली आहेत. बुधवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती आरोग्यमंत्री राजेश टोपे यांनी येथे दिली.

शहरी भागासाठी संचालक, आरोग्य सेवा (शहरी), उप संचालक-२ पदे, सहायक संचालक-४ पदे अशी ही नवी यंत्रणा असणार आहे. नवनिर्मित पदांबाबत माहिती देतांना आरोग्यमंत्री टोपे यांनी सांगितले की, शहरी भागांमध्ये प्राथमिक आरोग्य सेवांचे बळकटीकरण करणे आणि स्थानिक स्वराज्य संस्थांशी समन्वय ठेवण्याची जबाबदारी संचालक शहरी आरोग्य सेवा यांची असणार आहे. त्याचबरोबर महापालिका व नगरपालिका क्षेत्रातील आरोग्य सेवेसोबतच राष्ट्रीय आरोग्य कार्यक्रमांची नियमतीपणे देखभाल, परिक्षण व नियंत्रण करतानाच त्याचा आढावाही संचालक शहरी आरोग्य यांनी घ्यायचा आहे.

ज्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या नागरी कार्यक्षेत्रात आरोग्य सेवेचे काम कमी आहे ही बाब आरोग्य व नगरविकास विभागाच्या सचिवांना निदर्शनास आणून देतानाच कार्यक्षमता वाढीसाठी उपाययोजना सुचविण्याची जबाबदारी शहरी आरोग्य संचालकांची असणार आहे. साथरोग नियंत्रण कार्यक्रम प्रभावीपणे राबविणे तसेच आरोग्य सेवा, स्थानिक स्वराज्य संस्था आणि नगरविकास विभाग यांच्यात समन्वयाची जबाबदारी देखील संचालकांवर असणार आहे.

**(उर्वरित पान २ वर)**

# उद्धव ठाकरेंनी जाहीर केलेलं पॅकेज थट्टा करणारं : रवींद्र चव्हाण

*वृत्तसंस्था/ २८ ऑगस्ट*

**मुंबई :** उद्धव ठाकरे यांनी जाहीर केलेलं पहिलंच पॅकेज हे थट्टा करणारं असल्याची टीका भाजपचे आमदार रवींद्र चव्हाण यांनी केली आहे.

मच्छीमारांसाठी जाहीर केलेलं ५८ कोटी रुपयांचे पॅकेज हे फसवं असल्याची टीका चव्हाण यांनी पत्रकार परिषद घेत केली



आहे. यामुळे मच्छीमारांना कोणता दिलासा मिळणार नाही, त्यांचे नुकसान भरून येणार नाहीये.

उलट गेल्यावर्षी मत्स्य दुष्काळामुळे जाहीर झालेल्या मदतीचे निकष हे जसेच्या तसे लावण्यात आले आहेत. चक्रीवादळामुळे मच्छीमारांचे जे नुकसान झाले आहे.

त्या तुलनेत ५८ कोटी रुपयांचे पॅकेज काहीच नसल्याची टीका भाजपने केली आहे.